# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा.क्र. 353/2023    दिनांक : 14.09.2023

## 1)खुन :–

**माळाकोळी :–** दिनांक 13.09.2023 रोजी चे 06.00 वा. चे पुर्वी, **मयताचे घरी मौ. उमरजबोरी खु. ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1)भाग्यश्री एकनाथ जायभाये, वय 24 वर्षे, 2)सरस्वती एकनाथ जायेभाये, वय 03 वर्षे, रा. उमरजबोरी खु. ता. जि. नांदेड** यांचा यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे मयत मुलीस तुला पहिली मुलगी आहे. दुसरी मुलगी नको तु डॉक्टरकडे चेकअप कर व घर बांधकामासाठी व मुलीचे संगोपनासाठी माहेरहुन चार लाख रूपये घेऊन ये असे म्हणुन फिर्यादीचे मुलीस शारिरीक व माणसीक त्रास देवुन तिचा व मयताची लहान मुलगी सरस्वती यांचा गळा दाबुन खुन केला. वगैरे **फिर्यादी दैवशाला भ्र. व्यंकटी केंद्रे, वय 45 वर्षे, व्यवसाय गृहणी रा. पळसवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरन 135/2023 कलम 302, 498(अ), 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री निलपत्रेवार, मो.क्रं. 9881201052** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**हदगांव :–** दिनांक 12.09.2023 रोजी चे 22.00 वा. पासुन ते दि. 13.09.2023 चे 06.00 वा. चे दरम्यान, **संभाजीनगर हदगांव ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची बहीण छतीसगड येथे राहत असल्याने तिच्या हदगाव येथील संभाजीनगर येथील घराचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील रोख रक्कम 65,000/–रूपये व सोन्याचे दागीने जुने वापरते 21 ग्रॅम किंमती 42,000/–रूपयाचे असा एकुण 1,07,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी योगेश किशनराव सुर्यवंशी, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. हर्डफ ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरन 207/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 7386500709** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 12.09.2023 रोजी चे 02.00 ते 11.00 वा. चे दरम्यान, **पतंजली सुपर डिस्ट्रीब्युटर गोडाऊन समोर रोडवर एमआयडीसी नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्यांचा ट्रक क्रमांक युके–17/सीए–3378 असा राधीका कॅरीअर्स एनएलपी यांचे मार्फतीने पतंजली सुपर डिस्ट्रीब्युटर एमआयडीसी नांदेड येथील माल ज्यामध्ये पतंजली पेस्ट, साबन व चेहऱ्यावर लावण्यात आलेली क्रिम असे एकुण 1414 बॉक्स घेवुन आले. गोडाउन बंद असल्याने फिर्यादीने त्यांची ट्रक गोडाउन समोर रोडवर उभी करून झोपला असता ट्रकवरील ताडपत्री फाडुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने ट्रकमधील एकुण 16 बॉक्स ज्याची किंमत अंदाजे 52,660/–रूपयाचा मला चोरून नेला. वगैरे **फिर्यादी आमीर आजम पि. मोहम्मद सिध्दीकी, वय 54 वर्षे, व्यवसाय चालक रा. कसबा खतोली जि. मुजफरनगर (उत्तर प्रदेश)** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 663/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2240 व्यवहारे, मो.क्र. 8788371187** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**मुदखेड :–** दि. 11.09.2023 रोजी चे 18.45 वा. चे सुमारास, **मुदखेड ते उमरी जाणारे रोडवर डोणगाव शिवारातील कॅनॉल जवळ ता. मुदखेड जि. नांदेड येथे, मयत नामे गणेश भिकाजी जाधव, वय 35 वर्षे, रा. चिकाळा तांडा ता. मुदखेड जि. नांदेड** हा त्याची मो सा क्रमांक एमएच–26/बीजी–4645 वर उमरी ते मुदखेड येत असतांना समोरून येणारे वाहन क्रमांक एमएच–38/4326 चे चालकाने आपले ताब्यातील वाहन हे हयगई व निष्काळजीपणे चालउन मयताचे मो सा ला जोराची धडक देवुन मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी मनेश रावसाहेब जाधव, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. चिकाळा तांडा (मोठा) ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं. 188/2023 कलम 279, 337, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.क्र. 9823925710** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :—

**1)अर्धापुर :—** दिनांक 13.09.2023 रोजी चे 17.45 ते 18.00 वा. चे दरम्यान, **अर्धापुर ते वसमत जाणारे रोडवर सावरगाव पाटी जवळ ता. अर्धापुर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी व सोबत वाहक आणि प्रवाशी असे वसमत आगारातील बस क्रमांक एमएच–20/बीएल–0837 मध्ये बसुन अर्धापुर ते वसमत रोडने जात असतांना फिर्यादी यांची बस सावरगांव पाटी येथे आली असता बसमधुन प्रवासी उतरत असतांना अचानक तेथे अंदाजे 10 ते 15 अनोळखी इसम वय अंदाजे 20 ते 30 वयोगटातील असे गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीची बस अडवुन शासकिय कामात अडथळा निर्माण करून बसवर दगडफेक केली. अंदाजे एक लाख रूपयाचे नुकसान केले. सदर दगडफेकी मधील फिर्यादीना पण तोंडावर दोन्ही हाताचे कोपरावर व दोन्ही पायाचे घुडग्यावर जबर मार लागुन दुखापत केली. बसमधील प्रवासी नामे मारोती तुकाराम धोंडगे रा. मालेगांव यास पण मार लागला. इतर प्रवाशांना पण थापड बुक्यांनी मारहाण केली. वगैरे **फिर्यादी शेख युनूस शेख युसूफ, वय 55 वर्षे, व्यवसाय नौकरी बस चालक महामंडळ वसमत आगार रा. गुलशननगर वसमत ता. वसमत जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 348/2023 कलम 143, 147, 149, 353, 323, 332, 341, 504, 427, भादवी सह कलम 3, 4 महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बुदेवार मो.क्र. 9970732468** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर :—** दिनांक 12.09.2023 रोजी चे रात्री 19.30 वा. चे सुमारास, **कासारखेडा शिवारातील नाल्याचे पुलावर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी व सोबत वाहक आणि प्रवाशी असे वसमत आगारातील बस क्रमांक एमएच–20/बीएल–1146 मध्ये बसुन जात असतांना बस कासारखेडा शिवारातील नाल्याच्या वर असलेल्या पुलावर आली असता तेथे कांही इसम त्यांच्यापैकी चार इसम व दहा ते बारा इसम अंदाजे 20 ते 30 वयोगटातील हे गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीची बस अडवुन शासकिय कामात अडथळा निर्माण करून बसला काठीने व दगडाने मारून काचा फोडुन बसवर पेट्रोल टाकले त्यावेळी फिर्यादीचे अंगावर पेट्रोल पडले व त्यानंतर त्या लोकांनी बस पेटवुन जाळुन टाकली त्यामुळे बसचे अंदाजे तीन लाख रूपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी एकनाथ शंकराराव लिंगायत, वय 42 वर्षे, व्यवसाय नौकरी बस कंडक्टर महामंडळ वसमत आगार रा. कांडली ता. कळमनुरी जि. हिंगोली ह. मु. गरूनगर नमस्कार चौक नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 346/2023 कलम 143, 147, 148, 149, 353, 435, 427, 294, 341, 504, 427, भादवी सह कलम 3, 4 महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बुदेवार मो.क्र. 9970732468** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :—

**1)उस्माननगर :—** दिनांक 13.09.2023 रोजी चे 11.15 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहातेघरी मौ. मंगलसांगवी ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी/विदेशी दारू किंमती 9950/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2227 महादेव रेशमाजी महाबळे, ने. पोस्टे उस्माननगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 32/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/227 महाबळे, मो.नं. 7776992227** हे करीत आहेत.

**2)बिलोली :—** दिनांक 13.09.2023 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **पान टपरीचे मागे चिंचाळा ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1260/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2320 आनंदा गोपीराव शिंदे, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 167/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2561 बादेवाड, मो.नं. 9823628983** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड